'टास्क'च्या नावावर ८.७७ लाखांची फसवणूक

साहसिक वृत्त / १० जुलै

नागपूर : व्हिडिओ लाईक केल्यास पैसे देण्याच्या नावावर मोठी रक्कम गुंतविणाऱ्यांची सायबर गुन्हेगार नागरिकांची लाखो रुपयांनी फसवणूक करीत आहेत. आतापर्यंत अशी अनेक प्रकरणे पुढे आली असतानाही लोक त्यांच्या जाळ्यात अडकत आहेत. सायबर पोलीस ठाण्यात जवळपास दररोजच याबाबतच्या तक्रारी दाखल होत आहेत. नवीन प्रकरणात सायबर गुन्हेगारांनी एका व्यक्तीची ८.७७ लाख रुपयांनी फसवणूक केली आहे. भावेश मोरेश्वर उके (३७) रा. वैभवनगर, दिघोरी असे पीडित व्यक्तीचे नाव आहे. गत १४ जून रोजी भावेशच्या मोबाईलवर एक मॅसेज आला. हा मॅसेज अनन्या मिश्रा नावाच्या तरुणीचा होता. त्यात यूट्यूबवर व्हिडिओ लाईक आणि सब्सक्राइब केल्यास पैसे मिळण्याचे आमिष दाखविण्यात आले होते. भावेशकडून होकार मिळताच त्याला 'टास्क' देण्यात आले. टास्क पूर्ण झाल्यावर त्याच्या खात्यात पैसेही जमा झाले. यामुळे त्याचा विश्वास वाढत गेला.

त्यानंतर 'प्रिमियम टास्क' पूर्ण केल्यास अधिक लाभ मिळण्याचे सांगण्यात आले. त्यासाठी वेळोवेळी भावेशकडून ८.७७ लाख रुपये घेण्यात आले, मात्र कोणताही परतावा दिला नाही. आरोपींनी भावेशची मुळ रक्कमही परत केली नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच भावेशने पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी फसवणूक आणि आयटी ॲक्टच्या कलमान्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

प्रयोगशील शेतकरी व कृषी पदवीधर ठरताहेत प्रेरणादायी! कृषी विद्यापीठाचा 'आयडॉल' उपक्रम

साहसिक वृत्त / १० जुलै

अकोला : डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने यशस्वी व प्रगतशील शेतकरी व कृषी पदवीधरांचे कार्य इतर शेतकऱ्यांपुढे मांडण्यासाठी 'कृषी पदवीधर आयडॉल' उपक्रम सुरू केला. या उपक्रमामध्ये विदर्भातील विद्यापीठांच्या प्रक्षेत्रावर फलकांवर यशस्वी कार्य झळकले आहे. त्याचा सकारात्मक परिणाम दिसून येत आहे. विदर्भातील इतर शेतकऱ्यांसाठी यशस्वी शेतकरी व कृषी पदवीधर प्रेरणादायी ठरत आहेत.

'विकेल तेच पिकवणे' ही काळाची गरज झाली. प्रगत शेती तंत्रज्ञानाच्या सहकार्याने अपारंपरिक स्त्रोतांचा प्रभावी वापर करीत फायद्याच्या शेतीकडे बहुतांश शेतकऱ्यांचा कल आहे. व्यावसायिक शेती साकारणाऱ्या व इतरांना मार्गदर्शक ठरलेल्या विदर्भातील शेतकरी व कृषी पदवीधरांच्या कार्याचा परिचय इतरांना होण्याच्या दृष्टीने कृषी विद्यापीठाने विशेष उपक्रम सुरू केला. माजी कुलगुरू डॉ.विलास भाले यांनी विद्यापीठात फलकाद्वारे यशस्वी शेतकऱ्यांचे प्रयोग इतरांपर्यंत पोहोचवण्यास सुरुवात केली. त्या उपक्रमाला विद्यमान कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी व्यापक स्वरूप दिले. त्यांच्या संकल्पनेतून 'शेतकरी आयडॉल'चे फलक विदर्भातील गडचिरोलीपासून बुलढाणा जिल्ह्यापर्यंत विद्यापीठाच्या प्रक्षेत्रांवर जानेवारी महिन्यापासून झळकत आहेत.

प्रयोगशील शेतकऱ्यांनी कृषीचा अभ्यासक्रम पूर्ण करून व्यावसायिक शेती करण्यावर भर दिला. कृषी उद्योजक, निर्माते, मार्गदर्शक होत परिपूर्ण व्यावसायिक शेती साकारली. ते इतरांसाठी दिशादर्शक ठरतात. त्याच प्रमाणे अनेक यशस्वी कृषी पदवीधर देखील आहेत. त्यांनी यशस्वी कृषी उद्योग उभारले आहेत. त्या सर्वांचा कार्य परिचय देखील उपक्रमाच्या माध्यमातून करून दिला जात आहे. त्यांच्या कार्यातून कृषीसह इतरही अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या युवा पिढीला प्रेरणा मिळत आहे.

प्रत्येकी दोन महिन्यासाठी एक प्रगतशील शेतकरी व एक यशस्वी कृषी पदवीधर कृषी विद्यापीठाच्या विदर्भातील प्रक्षेत्रावर झळकतो. कृषी विज्ञान केंद्र व इतर संस्थांच्या माध्यमातून त्यांची निवड केली जाते.

जानेवारी महिन्यात उपक्रमाला सुरुवात झाली. पहिला दोन महिन्यासाठी गोंदिया जिल्ह्यातील प्रयोगशील शेतकरी संतोष बिसेन व उद्योजक गणेश देशमुख, मार्च व एप्रिल महिन्यासाठी बुलढाणा जिल्ह्यातील यशस्वी शेतकरी मोहन जगताप व यवतमाळ जिल्ह्यातील कृषी उद्योजिका संगीता सव्वालाखे, मे आणि जून महिन्यात अमरावती जिल्ह्यातील प्रयोगशील महिला शेतकरी हर्षना वाहणे, वर्धा जिल्ह्यातील कृषी उद्योजक धनंजय पहाडे हे आतापर्यंत कृषी विद्यापीठाचे 'आयडॉल' ठरले आहेत. जुलै व ऑगस्ट महिन्यात यवतमाळ जिल्ह्यातील प्रयोगशील शेतकरी आनंद गोविंदवार व कृषी पदवीधर गजानन जाधव यांच्या कार्याची माहिती संपूर्ण विदर्भ कृषी विद्यापीठाद्वारे फलकांवर लावण्यात आली आहे. प्रयोगशील शेतकरी व यशस्वी कृषी पदवीधरांचे कार्य लक्षवेधी ठरत आहे.

वाघाची शिकार, ११ आरोपींना अटक

साहसिक वृत्त / १० जुलै

गोंदिया : छत्तीसगड राज्याच्या बीजापूर जिल्हा वनविभागाने ७ जुलैला बिजापूर येथे वाघाच्या कातडीसह काही आरोपींना अटक केली होती. याप्रकरणाच्या सखोल तपासानंतर आणखी वीस जणांना अटक करण्यात आली. आरोपींनी वाघाची कातडी गोंदिया जिल्ह्याच्या सीमेवरून आणल्याची कबुली दिल्यानंतर सालेकसा तालुक्यातील मुख्य आरोपी आणि आमगाव तालुक्यातील कातडी विक्रयास मदत करणाऱ्या ११ आरोपींना अटक करण्यात आली आहे. गोंदिया जिल्ह्यात बहुतांश भाग हा जंगलानी व्यापलेला आहे. या जंगलांमध्ये वाघांसह इतर अनेक प्राण्यांचा वावर आहे. यामुळे वन्यप्राण्यांची शिकार आणि तस्करी करणाऱ्या टोळ्याही येथे सक्रिय आहेत. यापैकी एका टोळीने सालेकसा जंगलातून वाघाची शिकार केली आणि त्याची कातडी, नखे, हाडे आणि मिशीचे केस हे छत्तीसगड राज्यातील बीजापूर येथील सीआरपीएफच्या पोलीस उपनिरीक्षक अमित झा आणि त्याच्या २० सहकाऱ्यांना विकले. वनविभागाने चौकशी केली असता, शालिक मरकाम (५५, रा. कोसाटोला), सुरज मरकाम (४५, रा. कोसाटोला), जियाराम मरकाम (४२, रा. नवाटोला, सालेकसा) या तिघांनी मिळून विद्युत प्रवाहाद्वारे वाघाची शिकार केल्याची कबुली दिली. यानंतर वाघाची कातडी विक्रयासाठी मदत करणाऱ्या गेदलाल भोयर (५५, रा. लभानधारणी), तुकाराम बघेले (५९, रा. भाडीपार), अंगराज कटरे (६७, रा. दरबडा), वामन फुंडे (६०, रा. सिंधीटोला), शामराव शिवनकर (५३), जितेंद्र पंडित, यादवराव पंधरे, अशोक खोटेले, अशा एकूण ११ आरोपींना अटक करण्यात आली.

शेतमजुराची मुलगी बनली फौजदार, तनुजा खोब्रागडे हिचे एमपीएससी परिक्षेत सुयश

साहसिक वृत्त / १० जुलै

चंद्रपूर : शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, ही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची शिकवण बालपणापासून मुलीला देणाऱ्या चिमूर तालुक्यातील गिरोला गावातील गोकुलदास आणि कांता खोब्रागडे या गरीब शेतमजुराची मुलगी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन पोलीस उपनिरीक्षक झाली.

एमपीएससी परिक्षेत यश मिळविणाऱ्या या कर्तबगार मुलीचे नाव आहे तनुजा खोब्रागडे. तिच्या यशामुळे गिरोला हे शंभर लोकवस्तीचे गाव राज्यात चर्चेला आले आहे. ग्रामीण भागामध्ये आजही मुलगी दहावी बारावी झाली की, तिचे शिक्षण थांबविण्यात येते. तिच्या लग्नाचा विचार सुरू होतो. मात्र, ज्या आई वडिलांना शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे हे समजले ते स्वतः कष्ट घेऊन मुलींना पुढील शिक्षण देतात.

गिरोला येथील शेतमजूर असलेल्या गोकुलदास आणी कांताबाई खोब्रागडे यांनी मुलगी तनुजा हिला वाढविले. तनुजाचे प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झाले. वर्ग ४ थी ते ७ वी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा सावरी, ८ वी ते १० वी कर्मवीर विद्यालयात सावरी येथे झाले. दहावीत शाळेत प्रथम आल्याने राजश्री शाहू महाराज शिष्यवृत्तीचा तनुजाला लाभ मिळाला. ११ वी ते १२ वीचे शिक्षण शेगाव येथील नेहरू कानिष्ठ महाविद्यालयात झाले. बारावी झाल्यानंतर कुठे शिक्षण घ्यावे, असा प्रश्न तनुजासमोर होता. घरची परिस्थिती बेताची असल्याने चंद्रपूरातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिकण्याचा निर्णय घेतला.

आपल्या भावाकडे राहून तिने पुढील शिक्षण घेण्याचे ठरविले. आयटीआयनंतर येथील सरदार पटेल महाविद्यालयात इंग्रजी साहित्यात बी. ए. आणि एम.ए.ची पदवी घेतली. स्पर्धा परीक्षेची कोणतीही

तयारी न करता एम.ए.ला असताना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली होती. त्यामुळे यश संपादन करता आले नव्हते. पदवीतोर शिक्षण झाल्याबरोबर आई व्यथित करीत असलेले जीवन आपल्याही वाट्याला येऊ नये तसेच आई वडिलांच्या कष्टाचे चीज व्हावे म्हणून जिद्द, चिकाटी, मेहनत आणि अभ्यासातील सातत्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश खेचून आणले.

गावात शासकीय नोकरीपर्यंत कुणीही पोहोचले नसताना पोलीस अधिकारीपद मिळविल्याने तनुजाचे गावात व परिसरात अभिनंदन केले जात आहे. तनुजाने अतिशय परिश्रमपूर्वक गरिबीवर मात करित यश संपादन केल्याने तिच्या यशाचे कौतुकही सर्वच स्तरातून होत आहे. आई, वडील आणि भावासह कुटुंबाचा तथा गुरूंचा संपूर्ण पाठिंबा मिळाल्याने मला हे यश मिळवता आले. ग्रामीण भागातील मुलींनी आईवडिलांचे कष्ट, दारिद्र्य आपल्या वाट्याला येऊ नये म्हणून जिद्दीने शिक्षण घ्यावे. शिक्षणातून येणाऱ्या आत्मविश्वासाने, सातत्यपूर्ण अभ्यासाने यश नक्कीच मिळते. तरुण तरुणींनी मन लावून अभ्यास करावा. – तनुजा खोब्रागडे, पोलीस उपनिरीक्षक, गिरोला.

धक्कादायक! वडिलांचा अबोला सहन न झाल्याने मुलाने संपविले जीवन

साहसिक वृत्त / १० जुलै

नागपूर : दहावीत असलेला १४ वर्षीय एकुलता मुलगा, वडिलाचे त्याच्यावर निस्सीम प्रेम, बापलेक असूनही दोघांची मैत्री, दोघेही नातेवाईकांमध्ये आणि वस्तीतही मित्रासारखे वावरत, मुलासाठी जीव ओवाळून टाकणारा बाप म्हणून ख्याती, दहावीत असलेल्या मुलाला वडिलांनी महागडा शिकवणी वर्ग लावला, मात्र, मुलगा शिकवणी वर्गाला जायला कंटाळा करीत होता, त्याला प्रेमाने धडा शिकवून शिकवणी वर्गाला पाठविण्याची वडिलांची योजना होती, वडिलांनी मुलाशी अबोला धरला, पण बापाचे प्रेम समजून घेण्यात लेक कमी पडला.

वडिलांचा अबोला त्याला सहन झाला नाही, वडिलांचे मन दुखावल्याचे मुलाला अतीव दुःख, आता वडील आपल्याशी कधीच बोलणार नाहीत, अशी मनात सल, वडिलांचा दुरावा यामुळे मुलाने घरात गळफास घेऊन आत्महत्या करीत जीवन संपवले. वेद रितेश खेळवदकर (१४, रा. लालगंज, झाडे चौक) असे मृत मुलाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वेद हा दहावीचा विद्यार्थी होता. त्याचे वडील खासगी कंपनीत नोकरीवर आहेत. अभ्यासात हुशार असलेल्या वेदसाठी वडिलांनी नुकताच शिकवणी वर्ग लावला होता. मात्र, तो शिकवणी वर्गाला जात नव्हता. वडिलांनी त्याची समजूत घातली. तरीही तो जात नव्हता. वडिलांनी त्याला मारहाण करणे किंवा ओरडण्याऐवजी अबोला धरला. त्याच्याशी वडील तीन दिवसांपासून बोलत नव्हते. त्यामुळे वेदच्या हळव्या मनावर परिणाम झाला. त्याने आईशी बोलून शिकवणी वर्गात न जाण्यासाठी वडिलांची समजूत घालण्याची विनंती केली. मात्र, वडिलांनी त्याला अभ्यास आणि शिकवणी वर्गात गेल्यानंतरच बोलणार, अशी भूमिका घेतली.

वडिलांची नाराजी आणि अबोला वेदला सहन झाला नाही. त्यामुळे वेदने रविवारी दुपारी दीड वाजता घरात ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या केली. व्यथित झालेल्या वेदला दोन वाजता आईने चहा घेण्यासाठी आवाज दिला. मात्र, खोलीतून प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे आई-वडिलांनी खिडकीतून डोकावून बघितले. वेद गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसला. आईने मोठ्याने हंबरडा फोडला तर वडील जमीनवर कोसळून बेशुद्ध पडले. अन्य नातेवाईक आणि शेजाऱ्यांनी धाव घेतली. वेदला रुग्णालयात नेले. मात्र, तोपर्यंत वेदचा मृत्यू झाला. या प्रकरणी शांतीनगर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली. वेदच्या मृत्यूमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

भरधाव कारची उभ्या ट्रकला धडक

साहसिक वृत्त / १० जुलै

नागपूर : भरधाव कार ट्रकला धडकून झालेल्या अपघातात एकजण ठार तर कुटुंबातील आठजण जखमी झाल्याची घटना रामटेक ते भंडारा रोड अरोली खंडाळा गावाजवळ घडली.

परसराम लहानू भेंडारकर (वय ७० वर्षे) असे अपघातात ठार झालेल्या वृद्धाचे नाव आहे. तर चालक राजेश परसराम भेंडारकर (वय ३४ वर्षे), दुर्गा राजेश भेंडारकर (वय ३२ वर्षे), मेघा चंद्रहास बोंदरे (वय ३१ वर्षे), सिताबाई परसराम भेंडारकर (वय ६३ वर्षे), व लहान मुले हिमांशु राजेश भेंडारकर (वय ८ महिने),

ऊन्नती राजेश भेंडारकर(वय ५ वर्षे), भार्गवी चंद्रहास बोंदरे (वय ८ वर्षे), भाव्या चंद्रहास बोंदरे (वय ८ वर्षे) सर्व राहणार सोनकापाळसगाव. ता. साकोली जि भंडारा. अशी जखमींची नावे आहेत.

हा अपघात रविवारी दुपारी ३ वाजता झाला. भेंडारकर आणि बोंदरे कुटुंब रविवारी रामटेक येथे देवदर्शनाला गेले होते. परत येत असताना उभ्या ट्रकला कार धडकली. अपघातातील जखमींवर रामटेक येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

कोराडी वीज निर्मिती प्रकल्पात बॉयलर ट्यूब लिकेजमुळे २१५ दशलक्ष वीज युनिट्सचे नुकसान!

साहसिक वृत्त / १० जुलै

नागपूर : महानिर्मितीच्या कोराडी वीजनिर्मिती केंद्रातील ६६० मेगावॅटच्या नवीन संचामध्ये वारंवार बॉयलर ट्यूब लिकेज (बीटीएल) होत आहे. निकृष्ट कोळशामुळे असा प्रकार घडत असल्याची तक्रार आहे. हे संच बंद पडल्याने राज्याचे २१५ दशलक्ष वीज युनिटचे नुकसान झाले आहे. या विषयावर महानिर्मितीचे अधिकारी उत्तर देत नसल्याने तक्रारीबाबत शंका वाढत आहे.

महानिर्मितीच्या कोराडी प्रकल्पात ६६० मेगावॅटचे ३ आणि २१० मेगावॅटचा एक असे एकूण चार संच आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकार्पण केलेल्या ६६० मेगावॅटच्या नवीन संचातील बाष्पकांमध्ये वारंवार बॉयलर ट्यूब लिकेजची समस्या उद्भवत आहे. तीन महिन्यांमध्ये ४ ते ५ वेळा हे संच बंद पडले. एकदा बॉयलरच्या दुरुस्तीनंतर ६ महिने ते एक वर्षे पुन्हा त्यात दोष निर्माण होणे अपेक्षित नसल्याचे तज्ज्ञ सांगतात. दरम्यान, धुतलेल्या निकृष्ट कोळशामुळे वारंवार बॉयलर ट्यूब लिकेज होत असल्याची तक्रार 'लोकसत्ता'ला प्राप्त झाली आहे. या विषयावर एक महिन्यापूर्वी कोराडीचे मुख्य अभियंता विजय राठोड यांना विचारणा केली असता लवकरच उत्तर देऊ असे, त्यांनी कळवले. परंतु अद्याप उत्तर आले नाही.

दरम्यान, ६६० मेगावॅटच्या संचातून राज्यात सर्वात स्वस्त वीज निर्माण होते. हे संच वारंवार बंद पडल्याने महानिर्मितीला इतर संचातून वीज निर्माण करावी लागली. त्यामुळे महागडी वीज महावितरणला दिल्याने वीज कंपन्यांना त्याचा फटका बसला. हे संच वारंवार बंद पडल्याने सुमारे २१५ दशलक्ष युनिट वीज कमी मिळाली. महावितरणला या काळात महागडी वीज इतर स्त्रोतांकडून खरेदी करावी लागली.

तक्रार काय?

'लोकसत्ता'कडे आलेल्या तक्रारीनुसार, कोराडी प्रकल्पाला उपलब्ध होणाऱ्या कोळशाच्या उष्मांक ३,९०० ते ४,०००

दाखवला जातो. परंतु बंकरमधील उष्मांक तपासला असता तो ३,३०० पेक्षा कमी असतो. त्यामुळे हा उष्मांक ७०० ने वाढवून दाखवला जातो काय, हा प्रश्न उपस्थित होतो. नियमानुसार उष्मांकातील तफावत १२० हून अधिक नको. परंतु येथे जास्त असल्याने येथे धुतल्या जाणाऱ्या कोळशाच्या दर्जावर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. या धुतलेल्या कोळशामध्ये ३९ टक्के राख आली आहे. ही निकषाहून जास्त असल्याचाही दावा तक्रारीत आहे.

वारली चित्रकलेचा अद्भुत शालेय आविष्कार, पंतप्रधानांच्या हस्ते होणार प्रकाशन

साहसिक वृत्त / १० जुलै

वर्धा : वारली चित्रकलेच्या शालेय आविष्काराची राष्ट्रीय पातळीवर नोंद झाली असून या संग्रहाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. नव्या शैक्षणिक धोरणाच्या तिसऱ्या वर्षाच्या निमित्याने केंद्रीय शिक्षण मंत्रालयातर्फे कॉफी टेबल बुक प्रकाशित केल्या जात आहे. यात भारतातील सहा नवोपक्रमाचा समावेश असून वर्धेच्या 'वारली पेंटिंग' या उपक्रमालाही त्यात स्थान मिळाले आहे.

वारली पेंटींग हा उपक्रम वर्धा जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था म्हणजेच डाएटतर्फे राबविण्यात आला. आदिवासी जमातीने वारली कलेची देण समाजाला दिली आहे. सांस्कृतिक जीवनाच्या समृध्दीसाठी या आदिवासी कलेचे मोठे योगदान आहे. हा वारसा लक्षात घेवून डाएटने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त बाला (बिल्डींग एज अ लर्निंग एड) उपक्रमात वारली पेंटींग उपक्रम सुरू केला होता. संस्थेच्या प्रशिक्षकांनी या कलेचे धडे दिले.

शिक्षकांच्या मागणीनुसार तीन कार्यशाळा झाल्या. तसेच इतर विद्यार्थी, कोषागार कर्मचारी, कारागृहातील बंदीजन याच्यासाठी कार्यशाळा झाली. या उपक्रमाने अशी चित्रे काढण्याचे अनुभव विद्यार्थ्यांना मिळत आहे. इयत्ता दुसरी ते सहावीच्या मराठी पाठ्यपुस्तकात वारली चित्रकलेचे धडे समाविष्ट आहे. शाळेच्या भिंतीवर, विहिरीवर, झाडाच्या बुंध्यावर, शाळेच्या फाटकावर वारली चित्रे काढण्यात आली आहे. ही चित्रे वारली एक्सप्रेस, दांडी यात्रा, सेवाग्राम आश्रम आदी वास्तूंचे रेखाटन करतात.

तसेच या माध्यमातून वृक्षारोपण, करोना जागृती, मुलीना शिकवा, स्वच्छ शाळा, निपुण भारत, शिक्षणाचा अधिकार व अन्य विषयाचे संदेश देण्यात आले आहे. या कलेचा विद्यार्थ्यांना गणितातील पूर्वगणना, इंग्रजीतील क्रिया, भूगोल, इतिहास या विषयाच्या अध्ययनात उपयोग होत आहे.

कला ही अभ्यासक्रमासोबत जोडल्या गेल्याने विद्यार्थ्यांची शिक्षणातील गोडी वाढल्याचे सांगितल्या जाते. उपक्रमात प्राचार्य, व्याख्याते, कर्मचारी, मुख्याध्यापक, शिक्षक यांचा सहभाग लाभत आहे. महत्वाचे म्हणजे कलेचा समावेश असलेल्या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लवकरच होवू घातले आहे.

चंद्रपुरात 'एक सही संतापाची', महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा अनोखा उपक्रम

साहसिक वृत्त / १० जुलै

चंद्रपूर : महाराष्ट्रात सुरू असलेल्या राजकीय घडामोडीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने 'एक सही संतापाची' हे अभियान राबविण्यात येत आहे.

या अभियानाला चंद्रपूर जिल्ह्यात तथा शहरात चांगला प्रतिसाद मिळत आहे. चंद्रपूर येथील आझाद बगीचा, गांधी चौक, जनता महाविद्यालय चौकात मनसे जिल्हाध्यक्ष राहुल बालमवार, व्यापारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष महेश शास्त्रकार याच्या नेतृत्वात या उपक्रमाला शनिवारी सुरुवात करण्यात आली. या उपक्रमात शाळकरी मुले, तरुणांसह वृद्धसुद्धा सहभाग घेत असल्याचे दिसून आले.

महाराष्ट्राच्या राज्यात मागील काही वर्षाचा विचार

केल्यास मोठ्या उलथापालथ झाल्या. यासंदर्भात सोशल मिडियावर मोठ्या प्रमाणात चर्चा रंगत आहेत. जनसामान्यांपासून ते वृद्धांचाही या चर्चेत सहभाग आहे. भाजपा, शिंदे शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अजित पवार गट या परस्पर विरोधी विचारांची युती जनतेला पटलेली नाही, भाजपाचे फोडाफोडीचे राजकारण मतदारांना रुजलेले नाही. त्यामुळे लोक संताप व्यक्त करून स्वाक्षरी करीत आहेत.

महाविद्यालयीन विद्यार्थी, तरुण व ज्येष्ठही आपल्या प्रतिक्रिया नोंदवत आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे एक सही संतापाची हा अनोख्या उपक्रमाला लोकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमात ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, तरुण सहभाग घेत सध्याच्या राजकीय परिस्थितीवर रोष व्यक्त करीत आहेत. हे अभियान राबवताना यावेळी मनसेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.